
# जैवविविधता व्यवस्थापन समिती

## वास्तव आणि प्रश्न


### जैवविविधता व्यवस्थापन समिती (बायोडायव्हर्सिटी मॅनेजमेंट कमिटी, बी.एम.सी.) म्हणजे काय? 1



जैविक विविधता कायदा २००२ (बायोडायव्हर्सिटी ॲक्ट, बी.डी.ए.) याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या संस्थात्मक रचनेचा एक घटक म्हणून प्रत्येक स्थानिक संस्थेने बी.एम.सी. स्थापन करावी असे या कायद्याच्या कलम ४१ मध्ये म्हटले आहे. याबाबत अधिक विस्तृत तरतूदी २००४ सालच्या जैविक विविधता नियमांमध्ये (बायोडायव्हर्सिटी रूल्स) दिलेल्या आहेत.

बी.डी.ए.च्या अंमलबजावणीची जबाबदारी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयावर सोपविलेली आहे.जैविक संसाधनांचे संवर्धन, वहिवाट तसेच व्यापारी कारणांसाठी वापर यांविषयीचे निर्णय घेण्यासाठी या कायद्याने एका त्रिस्तरीय संस्थात्मक रचनेची तरतूद केलेली आहे. सर्वोच्च स्तरावर चेन्नईतील राष्ट्रीय जैवविविधता ॲथॉरीटी (नॅशनल बायोडायव्हर्सिटी ॲथॉरिटी, एन.बी.ए) आहे. त्याखालोखाल राज्यस्तरीय जैवविविधता बोर्ड (स्टेट बायोडायव्हर्सिटी बोर्ड, एस.बी.बी) आहेत. सर्वांत खालच्या (स्थानिक) पातळीवर बी.एम.सी. आहेत.

### बी.एम.सी. कोण स्थापन करू शकते? 2



ग्रामीण तसेच शहरी भागात स्थानिक संस्थांनी बी.एम.सी. स्थापन करायची आहे. ग्रामीण भागात ग्रामपंचायती अथवा त्याच प्रकारच्या अन्य संस्थांना (उदा. स्वायत्त जिल्हा समिती, हिल कौन्सिल) स्थानिक संस्था समजले जाते. शहरी भागात नगरपालिकांना स्थानिक संस्था समजले जाते. ज्या भागांमध्ये पंचायती अथवा पालिका दोन्हीही नाहीत अशा ठिकाणी संविधानाने नमूद केलेल्या तसेच कायदेशीररित्या स्थापन केलेल्या स्वयंशासनाच्या कोणत्याही संस्थांना स्थानिक संस्था समजले जाते.

### स्थानिक संस्थांनी बी.एम.सी. स्थापण्यास नकार दिल्यास काय होऊ शकते? 3

या कायद्यामध्ये अशा परिस्थितीचा विचार केलेला नाही. बी.एम.सी. स्थापन करणे सक्तीचे आहे (कलम ४१.१ तसेच नियम २२.१). मात्र घटनात्मक तरतूदींच्या आधारावर स्थानिक संस्थांना स्वयंशासनाविषयीचा अधिकार म्हणून बी.एम.सी. स्थापन करण्यास नकार देण्यासाठी वाव असू शकेल.

### बी.एम.सी.ची संरचना कशी असावी? 4

बी.एम.सी. मध्ये एक अध्यक्ष आणि स्थानिक संस्थेने शिफारस केलेले कमाल सहा सदस्य असावेत. शिफारस केलेल्या एकूण सदस्य संख्येच्या किमान एक तृतीयांश महिला असाव्यात व किमान १८% सदस्य अनुसूचित जाती / जमातींचे असावेत. अध्यक्षांची निवड बी.एम.सी. च्या सदस्यांमधून केली जावी (नियम २२.२ आणि २२.३).

### ज्या राज्यात एस.बी.बी. नाही अशा राज्यात बी.एम.सी. स्थापन केल्या जाऊ शकतात का? 5



बी.डी.ए. अनुसार, बी.एम.सी. ही स्थानिक संस्थेने स्थापन करावयाची असून तिची स्थापना व कार्य हे एस.बी.बी.च्या अस्तित्वावर अवलंबून नाही.

## बी.एम.सी. चे कार्य काय? 6



जैवविविधतेचे संवर्धन, शाश्वत वापर आणि नोंदणीच्या दृष्टीने बी.डी.ए. ने बी.एम.सी. ला व्यापक अधिकार दिलेले आहेत. यामध्ये अधिवास, भूप्रकार यांचे संरक्षण तसेच स्थानिक पीकप्रकार, स्थानिक पाळीव जनावरांच्या प्रजाती व सूक्ष्म जीवांचे संगोपन यांचा समावेश होतो. जैविक संसाधनांची तसेच संबंधित परंपरागत ज्ञानाची नोंद ठेवणेही बी.एम.सी.वर बंधनकारक आहे (क़लम ४१.१).

असे असूनही जैवविविधता कायद्याअंतर्गत बनविलेले नियम (नियम २२) हे बी.एम.सी. चे कार्य केवळ पी.बी.आर. बनविण्यापुरते मर्यादित ठेवतात. सदर कार्यात बी.एम.सी.ना एस. बी.बी. मार्गदर्शन करतील. पी.बी.आर. मध्ये स्थानिक जैविक संसाधनांची उपलब्धता व संलग्न ज्ञान, त्यांचा औषधी उपयोग, अन्य उपयोग व त्यासंबंधीचे पारंपारिक ज्ञान याविषयी संपूर्ण माहिती असली पाहिजे (नियम २२.६). बी.एम.सी. ने स्थानिक वैदूंद्वारा केल्या जाणाऱ्या जैविक संसाधनांच्या वापराविषयीच्याही नोंदी ठेवणे गरजेचे आहे (नियम २२.७).

बी.एम.सी. ने एन.बी.ए. व एस.बी.बी. यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार सल्ला द्यावा, असे नियमांमध्ये नमूद केले आहे (नियम २२.७). याचा अर्थ असा की बी.एम.सी. स्वतः पुढाकार घेऊन एस.बी.बी. वा एन.बी.ए. ला सल्ला देऊ शकत नाही, तर त्या संस्थांनी विचारल्यानंतरच सूचना करू शकते. तसेच, अंतिम निर्णय या सल्ल्याप्रमाणे घेण्यास उच्चाधिकार समित्या बांधील नाहीत.

पी.बी.आर. व्यतिरिक्त आणखी एक नोंदवही बी.एम.सी. ला ठेवावी लागेल (नियम २२.११). यामध्ये जैविक संसाधनांची वहिवाट, दिले गेलेले अधिकार, पारंपारिक ज्ञान, त्यासाठी गोळा केलेल्या शुल्काच्या नोंदी, फायद्यांच्या वाटपाविषयी माहिती तसेच फायद्यांच्या वाटपाच्या पद्धती याविषयीच्या संपूर्ण माहितीचा समावेश असावा.

परंतु जैविक संसाधनांचा अधिकार ठरविणाऱ्या व मान्य करणाऱ्या एन.बी.ए. किंवा एस.बी.बी. कडून बी.एम.सी. कडे ही माहिती कशी पोहोचेल याचे मार्गदर्शन कायद्यात करण्यात आलेले नाही. तसेच बी.डी.ए. किंवा नियमांमध्ये बी.एम.सी. च्या संवर्धनविषयक कार्याची सविस्तर माहिती देण्यात आलेली नाही.

## राष्ट्रीय व राज्यपातळीवर बी.एम.सी.ची स्थापना करण्याविषयी काही मार्गदर्शन करण्यात आले आहे का? 7

ऑगस्ट २००८ पर्यंत उपलब्ध माहितीनुसार बी.एम.सी.ची स्थापना करण्याविषयी असे मार्गदर्शन वा प्राथमिक तत्वे कोठेही दिलेली नाहीत.

## पी.बी.आर. तयार करण्याचे काय परिणाम होतील? 8



जैविक संसाधनांची नोंद ठेवणे हे काही स्थानिक समूहांसाठी संपूर्णतः अपरिचित वा निरूपयोगी काम नाही. शतकानुशतके स्थानिक समुदाय जैविक संसाधनांची उपलब्धता व त्यासंबंधीचे पारंपारिक ज्ञान लिखित, मौखिक वा अन्य सांस्कृतीक स्वरूपांत जतन करीत आलेच आहेत. सदर पी.बी.आर. पद्धत अधिकृत कामासाठी मोठया प्रमाणावर माहितीचा वापर करण्याच्या उद्देशाने एन.बी.ए. च्या 'जैवविविधता व पारंपारिक ज्ञाना' वरील तज्ज्ञ समितीने विकसित केली आहे. ही 'अधिकृत जन जैवविविधता नोंदवही' (पी.बी.आर.) पूर्वनियोजीत आराखडे पुरवते. जैवविविधता व्यवस्थापन समितीने संशोधक व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने तसेच शास्त्रज्ञांच्या अनुमोदनाने हे आराखडे भरायचे आहेत. ही माहिती पुढे संगणकीकृत करून भारतीय जैवविविधता

माहिती प्रणालीत (इंडीयन बायोडायव्हर्सिटी इन्फॉर्मेशन सिस्टिम, आय.बी.आय.एस.) ठेवली जाईल.

बी.एम.सी. ही पी.बी.आर. ची एकमेव ताबेदार असेल वा इतर कोणालाही हे अधिकार असतील हे आजमितीस स्पष्ट नाही. बी.एम.सी. ने पी.बी.आर. ठेवाव्यात व अधिकृत कराव्यात असे नियमांमध्ये म्हटले असले (नियम २२.१०), तरीही याविषयीची कार्यप्रणाली उपलब्ध नाही. जन जैवविविधता नोंदवहीमध्ये नोंदवल्या गेलेल्या ज्ञानाचा गैरवापर वा अप्रस्तुत सादरीकरण होऊ नये यासाठी कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही. तसेच पी.बी.आर. मधील माहिती एकदा आय.बी.आय.एस. मध्ये गेली की ती बी.एम.सी. व स्थानिक समुदायांना सहजरित्या उपलब्ध राहणार नाही.

बी.एम.सी. प्रस्थापित करण्यासाठी पुरेसे संरचनात्मक पाठबळ नसताना, तसेच नोंदवल्या गेलेल्या ज्ञानाच्या सुरक्षेची हमी नसताना, देशभर पी.बी.आर. निर्मितीचे काम सुरू करण्याच्या उपक्रमामध्ये काही धोका असू शकतो. पी.बी.आर. मध्ये एकदा नोंदवली गेलेली माहिती स्थानिक समूहांतील लोकांना बाहेरील लोकांच्या मदतीविना सहज उपलब्ध होणार नाही, हे स्पष्टच आहे.

## 9 बी.एम.सी. ला त्यांच्या परिसरातील जैविक संसाधनांच्या वापरासाठी कोणाला परवानगी देण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार आहे का?




नाही. संशोधन, व्यावसायिक विनियोग वा पेटंट, भौगोलिक प्रमाणक यांसारख्या बौद्धिक संपदा अधिकारांसाठी (इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राइटस्,आय.पी.आर.) जैविक संसाधनांचा वापर करण्यास कोणाला मान्यता देण्याचे वा नाकारण्याविषयीचे अधिकार बी.एम.सी. ला देण्यात आलेले नाहीत. विदेशी व्यक्ती/ संस्थेला परवानगी देण्याचे अधिकार एन.बी.ए. च्या आधीन असून अशी परवानगी देण्यापूर्वी एन.बी.ए. ने संबंधित बी.एम.सी. शी ''सल्लामसलत'' करणे सक्तीचे आहे (कलम ४१.२). भारतीय व्यक्ती/संस्थेने अशा वापरापूर्वी एस.बी.बी. ला केवळ पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. एस.बी.बी. ने संसाधनांच्या वापराच्या शर्ती लागू करण्यापूर्वी बी.एम.सी. शी ''सल्लामसलत'' करणे सक्तीचे आहे (कलम २४.१, २४.२ आणि ४१.२).

## 10 ''सल्लामसलत'' म्हणजे काय?

एन.बी.ए. तसेच एस.बी.बी. यांनी बी.एम.सी. शी सल्लामसलत करणे सक्तीचे असले, तरीही सदर समितीचा सल्ला मानणे त्यांच्यांवर बंधनकारक नाही. बी.एम.सी. च्या मताला अधिक वजन मिळावे, म्हणून 'सल्लामसलत' या शब्दाची व्याख्या काही राज्यांच्या नियमावलीत (उदा. मध्य प्रदेश, सिक्कीम) करून त्यात पूर्वसूचना व पूर्वमान्यतेचा समावेश करण्यात आला आहे.परंतु राज्यस्तरीय नियम हे केवळ त्या राज्याच्या एस.बी.बी. लाच लागू होतात; ते एन.बी.ए. ला लागू होत नाहीत.

## 11 बी.एम.सी. स्थापन झालेली नसल्यास सल्लामसलत प्रक्रिया होऊ शकते काय?

सद्य:स्थितीत, अनेक ठिकाणी बी.एम.सी. स्थापन झालेल्या नसतानाही एन.बी.ए. अर्जाला मान्यता देते. कायद्यामध्ये वा नियमांमध्ये, अशी परवानगी रोखू शकणारी कोणतीही तरतूद नाही.



## जैविक संसाधनांच्या वापरासाठी परवानगी देताना बी.एम.सी.काही शुल्क आकारू शकते का? 12

आपल्या क्षेत्रातून व्यावसायिक कारणांसाठी जैविक संसाधनांचा वापर वा विनियोग कोणाला करायचा असल्यास बी.एम.सी. काही शुल्क आकारू शकते (कलम ४१.३). विदेशी संस्था / व्यक्तींकडून व अनिवासी भारतीयांकडून व्यावसायिक कारणांसाठी जैविक संसाधनांचा वापर वा विनियोग करण्यापूर्वी एन.बी.ए. ची पूर्वमान्यता घेण्याची आवश्यकता आहे. या मान्यतेनंतर बी.एम.सी. शुल्क आकारू शकते.

## कोणत्या आधारावर शुल्क आकारणी केली जाईल, हे कोण ठरवणार? 13



ज्या विदेशी व्यक्ती/संस्था व अनिवासी भारतीयांनी जैविक संसाधने व पारंपारिक ज्ञानाचा व्यावसायिक विनियोग करण्याविषयी एन.बी.ए. ची पूर्वमान्यता घेतली आहे, त्यांच्या बाबतीत एन.बी.ए. नफ्याची हिस्सेदारी व पद्धत ठरवते. यामध्ये आर्थिक तसेच प्रक्रियेसंबंधीच्या शर्तींचाही समावेश होतो (कलम २१.२). यासाठी एन.बी.ए. ने एक करारनाम्याचा मसूदा तयार केलेला आहे, जो प्रत्येक नव्या अर्जाच्या संबंधात गरजेप्रमाणे बदल करून वापरला जातो. सदर मसूद्याप्रमाणे केलेल्या करारनाम्यावर अर्जदार तसेच एन.बी.ए. यांना सह्याकराव्या लागतात. भारतीयांनी जैविक संसाधनांचा तसेच संबंधीत ज्ञानाचा व्यावसायिक कामासाठी वापर केल्यास, कोणत्या आधारावर बी.एम.सी. शुल्क आकारू शकते, हे कायद्यात नमूद केलेले नाही.

## जमा झालेल्या 'स्थानिक जैवविविधता निधी' (लोकल बायोडायव्हर्सिटी फंड, एल.बी.एफ.) चे काय करायचे हा निर्णय कोण घेते? 14

जिथे स्वयंशासनाची शासनमान्य संस्था जेथे कार्यरत आहे अशा, राज्य शासनाने घोषित केलेल्या प्रत्येक भागात/प्रदेशात एल.बी.एफ. तयार करायचा आहे (कलम ४३). राज्य शासन, एस.बी.बी. तसेच एन.बी.ए. यांच्याकडून प्राप्त झालेले अनुदान आणि स्थानिक पातळीवर बी.एम.सी.ने आकारलेले शुल्क मिळून एल.बी.एफ. उभारला जातो.


सदर निधीच्या व्यवस्थापनाबाबतचे निर्णय कसे घ्यावेत याबाबतच्या सूचना राज्य शासनाने द्यायच्या आहेत (कलम ४४.१). हा निधी स्थानिक समितीच्या आखत्यारीत येणाऱ्या भागातील जैवविविधता संवर्धन तसेच संगोपनासाठी वापरायचा आहे. तो स्थानीय समाजाच्या निसर्ग-संवर्धन-सुसंगत उद्दिष्टांसाठी सुध्दा वापरला जाऊ शकतो (कलम ४४.२).

## एल.बी.एफ. चे नियंत्रण आणि लेखापरीक्षण कसे केले जाते? 15



एल.बी.एफ. ज्याच्या ताब्यात आहे अशा व्यक्तीला प्रत्येक आर्थिक वर्षासाठी वार्षिक अहवाल तयार करावा लागतो. त्यामध्ये मागील आर्थिक वर्षात झालेल्या सर्व उलाढालींचा लेखाजोखा द्यावा लागतो. याच व्यक्तीने वर्षभरातील आर्थिक व्यवहारांचा हिशोब ठेवून आर्थिक वर्षाच्या शेवटी, राज्याच्या 'अकाउंटंट जनरल' च्या सूचनांनुसार लेखापरीक्षण करून घ्यावे लागते. सदर व्यक्तीला वार्षिक अहवाल, लेखापरीक्षकाचा अहवाल तसेच लेखापरीक्षण झालेले ताळेबंद स्थानिक संस्थेला सादर करावे लागतात. सदर स्थानिक संस्थेला (उदा. पंचायत, पालिका, इ.) जिल्हा मॅजिस्ट्रेटकडे हे अहवाल सादर करावे लागतात (कलम ४५, ४६ व ४७).

## 16 जैवविविधता व्यवस्थापनातून होणाऱ्या फायद्यांच्या वाटणीबद्दल बी.डी.ए. कोणते पर्याय समोर मांडतो? या बाबतीत बी.एम.सी. ला काही मताधिकार आहेत काय?



स्थानिक समूहाच्या ताब्यात असलेली संसाधने अथवा पारंपारिक ज्ञान वापरून जेव्हा एखादी परकीय वा देशी व्यक्ती / संस्था नफा मिळवते तेव्हा जैवविविधतेपासून मिळणाऱ्या फायद्याच्या वाटणीचा प्रश्न येतो. असा फायदा झाल्यास त्याच्या वाटणीसंबंधीच्या निर्णयासाठी व्यवस्था तयार करावी लागेल.

अर्जदार व एन.बी.ए. किंवा फायद्याचे इतर कोणतेही मान्यताप्राप्त भागीदार यांचे संयुक्त आय.पी.आर. (उदा. पेटंट, भौगोलिक प्रमाणक, इ.) असणे ही फायद्याची वाटणी करण्याची एक पद्धत आहे. 'फायद्याच्या भागीदारी' मध्ये एक वा अधिक बी.एम.सी. / गावे यांचा समावेश होऊ शकतो. तसेच फायद्याच्या वाटपामध्ये शास्त्रज्ञ, अर्जदार व फायद्याचे अन्य वाटेकरी यांमध्ये एकत्रित स्वरूपात भांडवली निधीचा वापर करण्याचेही प्रयत्न केले जाऊ शकतात. सदर भांडवली निधी, संशोधन, संयुक्त सर्वेक्षण अशा कामांसाठी वापरता येऊ शकतो.

जैवविविधता व्यवस्थापनातून मिळणारे आर्थिक तसेच आर्थिकेतर असे दोन्ही प्रकारचे फायदे एन.बी.ए. ला मान्य असलेल्या अशा कोणत्याही भागीदारांना देण्यात येतील.

बी.एम.सी. तसेच स्थानिक समूहांना फायद्याचे भागीदार वा फायद्याच्या वाटपाची सूत्रे ठरवण्याच्या कामात कोणतीही भूमिका नाही. हे काम एन.बी.ए. च्या आखत्यारीत येते.

सध्याच्या कायदेशीर तरतूदींनुसार फायद्याचा बहुतांश हिस्सा हा 'नॅशनल बायोडाव्हर्सिटी फंड' मध्ये जमा होतो (कलम २१.३).

## 17 स्थानिक समुदायाच्या सदस्याला त्याच्या उपजिविकेवर एन.बी.ए. अथवा एस.बी.बी. ने दिलेल्या मान्यतेचा परिणाम होतो अथवा नाही, हे कसे समजेल? बी.एम.सी. मान्यताप्राप्त प्रस्तावांची नोंद ठेवेल काय?

एन.बी.ए. ने मंजूर केलेला प्रत्येक प्रस्ताव हा सार्वजनिक माहितीचा भाग आहे, असे मानले जाते. परंतु,वस्तुस्थितीत एन.बी.ए. च्या संकेत स्थळावर अत्यंत त्रोटक माहिती उपलब्ध असते. पारदर्शक व्यवहाराच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास ही माहिती पुरेशी नाही.

कायद्याची योग्य अंमलबजावणी करायची झाल्यास, संसाधनांच्या वापरासाठीच्या प्रत्येक मान्यतेपूर्वी एन.बी.ए. ही बी.एम.सी. शी सल्लामसलत करेल व त्यामुळे बी.एम.सी. ला मिळालेली माहिती स्थानिक समुदायापर्यंत पोहोचेल. बी.एम.सी. या सर्व माहितीची नोंद ठेवेल (पहा : प्रश्न क्र.६).

## 18 नफ्याच्या हिस्सेदारीविषयी अथवा प्रस्ताव मान्यतेविषयी वाद उभा राहिल्यास काय? एस.बी.बी. अथवा एन.बी.ए. च्या मताशी बी.एम.सी. सहमत नसल्यास काय?



कायद्यानुसार बी.एम.सी.ला कोणालाही जैविक ज्ञान किंवा संसाधनांचा वापर वा विनियोग करण्यापासून रोखण्याचा अधिकार नाही. एस.बी.बी. वा एन.बी.ए. च्या निर्णयाविरूद्ध दाद मागण्यासाठी या कायद्याने वा नियमांनी कोणतेही विशेष व्यासपीठ बी.एम.सी. ला उपलब्ध करून दिलेले नाही. देशाच्या अन्य कोणाही नागरीकाला उपलब्ध असणाऱ्या व्यासपीठांवरच बी.एम.सी. याबाबत दाद मागू शकते.

एन.बी.ए. वा एस.बी.बी. च्या निर्णयाविरूद्ध दाद मागायची झाल्यास प्रस्तावाला मंजूरी मिळाल्याची अधिकृत माहिती मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, बी.एम.सी. उच्च न्यायालयाकडे दाद मागू शकते (कलम ५२).

## एक बी.एम.सी. दुसऱ्या बी.एम.सी. च्या मान्यताविषयक वा शुल्कविषयक निर्णयाच्या विरूद्ध कोणापाशी दाद मागू शकते? 19

अशी दाद मागण्यासाठी कोणतीही संरचनात्मक व्यवस्था या कायद्याप्रमाणे आज उपलब्ध नाही.


## सध्या अस्तित्वात असणाऱ्या विविध समिती (जसे ग्राम वनसमिती, पर्यावरण विकास समिती) व बी.एम.सी. यांमध्ये परस्परसंबंध कशा प्रकारचे असतील? 20

हा कायदा अथवा राष्ट्रीय स्तरावरील नियम यांत कोठेही बी.एम.सी. व शहर / खेड्यातील अन्य गट यांमध्ये परस्परसंबंध कसे असावेत याविषयी कोणतीही तरतूद आढळत नाही. काही राज्यांच्या नियमांनुसार (मध्य प्रदेश, सिक्कीम) स्थानिक प्रशासन संस्थेला बी.एम.सी. च्या जबाबदाऱ्या, या सध्या अस्तित्वात असणाऱ्या अन्य कोणत्याही समितीद्वारे पार पाडता येतील असे वाटल्यास, ती तसे करू शकते. अशा परिस्थितीत वन समिती वा पर्यावरण विकास समिती किंवा संपूर्ण ग्रामसभाच बी.एम.सी. च्या जबाबदाऱ्या पार पाडेल.

## 'जैवविविधता वारसा स्थळे' (बायोडायव्हर्सिटी हेरिटेज साइटस, बी.एच.एस.) घोषित करण्यामध्ये बी.एम.सी. ला काही भूमिका आहे का? 21

स्थानिक गटांशी चर्चा करून 'जैवविविधता वारसा स्थळे' राज्य सरकारने घोषित करावयाची आहेत (कलम ३७). या कार्यात स्थानिक गटांनी बी.एम.सी. बरोबर कसे सहकार्य करावे यासंबंधी ऑगस्ट २००८ मध्ये मिळत असलेल्या माहितीनुसार कोणतेही मार्गदर्शन उपलब्ध नाही.

## जैविक चोरीच्या (बायोपायरसी) घटनांमध्ये बी.एम.सी. काय करू शकते? 22



एखाद्या जनसमूहाने पारंपारिक ज्ञान वा जैविक संसाधने यांचा जर गैरवापर केला, किंवा स्थानिक समूहाशी चर्चेविना व त्यांना फायद्यामध्ये वाटणी दिल्याशिवायच संसाधनांचे व्यापारीकरण करण्यात आले, तर बी.एम.सी. काय करू शकते, यांविषयी कायद्यामध्ये वा नियमांमध्ये कोणतीही तरतूद आढळत नाही. बी.एम.सी. अशा घटनांमध्ये एस.बी.बी. अथवा एन.बी.ए. कडे दाद मागू शकते असे गृहीत धरता येईल, मात्र कायद्यात वा नियमांत त्यासंबंधी कोणताही उल्लेख नाही.

ह्या माहितीचे एकत्रीकरण कल्पवृक्ष व ग्रेन या संस्थांच्या सहयोगाने करण्यात आले आहे.

फोटो : कांची कोहली, पासंग दोरजी लेप्चा, मश्कुरा फरीदी आणि आशीष कोठारी
चित्रांकन : मनीषा गुटमन
अनुवाद : रोहन जोशी
फोन : ९१-११-२९२२२१३७९, ९१-२०-२५६७५४५०
फॅक्स : ९१-२०-२५६५४२३९
ईमेल : ashishkothari@vsnl.com, kanchikohli@gmail.com
वेबसाईट : www.kalpvriksh.org

GRAIN